# औरंगाबाद महानगरपालिका औरंगाबाद

**दिनांक 05.02.2013 (का.प.क्र.26) रोजी संपन्न झालेल्या स्थायी समिती सभेचे इतिवृत्त.**

मंगळवार दिनांक 05.02.2013 (का.प.क्र.26) रोजी मा.सभापती श्री.विकास रतनलाल जैन यांचे अध्यक्षतेखाली महानगरपालिकेची स्थायी समितीची सभा महानगरपालिकेच्या मुख्य कार्यालयातील मलीक अंबर स्थायी समिती सभागृह येथे दूपारी 12.45 वाजता वंदेमातरम् या गिताने सुरू झाली सभेला मा.प्र.आयुक्त तथा कार्यकारी अभियंता श्री.पानझडे, उपआयुक्त (म) तथा प्र.नगर सचिव, श्री.अय्युब खान यांचेसह संबधीत अधिकारी तसेच खालीलप्रमाणे सन्माननीय सदस्य उपस्थित होते.

01. स. श्री.मेघावाले मोहन धन्नुलाल
02. स. श्री. हाळनोर गिरजाराम नानाराव
03. स. श्री.वैद्य रेणुकादास (राजु) दत्तोपंत
04. स. श्रीमती राजपुत प्राजक्ता विश्वनाथ
05. स. श्री.शेख अब्दुल असद शेख अब्दुल रशीद
06. स. श्री.बाळुलाल वरदाजी गुजर
07. स. श्री. खान अक्रम करीम खान
08. स. श्री.जाधव विजेंद्र मुरलीधर
09. स. श्री.मो.मुजीबोद्दीन कदीरोद्दीन
10. स. श्रीमती निलाबाई देविदास जगताप
11. स. श्री.समीर सुभाष राजुरकर

चर्चा :

श्री.गिरजाराम हाळनोर : आस्थापना-2 विभागात लागलेल्या आगीमध्ये चतुर्थश्रेणी कर्मचाऱ्यांचे कागदपत्रे जळुन खाक झालेले आहे. प्राप्त माहितीनुसार, 1124 कर्मचाऱ्याचे कागदपत्रे, सेवापट होते. शॉट सर्कीटमुळे आग लागल्याचे सांगण्यात आले. मा.खासदार, मा.आमदार, मा.महापौर यांचेसोबत झालेल्या पहाणीमध्ये वाईरींग जळाल्यानसुन विभागातील वायरींग जशास तश्या आहेत असे आढळुन आलेले आहे. यावरून सदरील प्रकार हा संशयास्पद दिसुन येत आहे. टाऊन प्लॅनिंग विभागही अतिसंवेदनशील विभाग आहे याकडेही प्रशासनाने लक्ष द्यायला पाहिजे भविष्यात अशी घटना होणार नाही याकडे सर्वांनी लक्ष द्यावे.

मा.सभापती :सदरील घटनेचा प्रशासनाने खुलासा करावा. तसेच महानगरपालिका कार्यालयांमध्ये फायर सेफ्टी यंत्रणा कार्यान्वित करण्याकरीता सभेने प्रशासनास वारंवार निर्देशित केलेले आहे. मनपा इमारतीची फायर एनओसी घेतलेली आहे का? खुलासा करण्यात यावा.

उपआयुक्त (प्र) :सकाळी साडे आठ वाजता फोन आला की, आस्थापना विभागात आग लागली आहे. यानंतर तात्काळ ऑफिसमध्ये भेट देण्यात

आली त्यात आढळुन आले की, विभागातील फॅन पुर्ण जळुन खाली पडलेला होता. त्याखाली अर्धवट जळालेल्या अवस्थेत अभिलेख होते. त्यात आढळुन आले की, 1124 कर्मचाऱ्यांच्या संचिका आहेत. डयुपलिकेट सेवापट जळालेल्या अवस्थेत आढळुन आले. बाजुच्या टेबलवरील संचिका जश्यास तश्या अवस्थेत आहेत. संगणकामध्ये 1124 कर्मचाऱ्यांची गोषवारा संग्रहीत आहे. सदरील आग खुप छोटया प्रमाणात लागलेली आहे आणि ती कोपऱ्यामध्ये लागलेली आहे. विभागामधील इतर साहित्य हे शाबीत आहे.

श्री.रेणुकादास वैद्य :सकाळी कुणाचा फोन आला होता.

उपआयुक्त (प्र) :सकाळी आस्थापना अधिकारी-2 श्री.अभंग यांचा फोन आला होता.

श्री.रेणुकादास वैद्य :उपआयुक्त प्रशासन यांना फोन आल्यानंतर पहाणी करण्यासाठी कार्यालयात आले व पहाणी केल्यानंतर फॅन जळाल्याचे निदर्शनास आले. पदाधिकाऱ्यांनी पहाणी केल्यावर लक्षात आले की, फॅन खाली पडलेला आहे. फॅन जळुन खाली पडला हे कशाच्या आधारे प्रशासनाने खुलासा केलेला आहे. तसेच ज्या सेवापट कागदपत्रे हे 1124 चेच होते हे कशावरून प्रशासनास कळाले. आग छोटया प्रमाणात आहे हे सांगण्यात आले तसेच इतर संचिका जशास तश्या आहेत. शॉर्टसर्कीटमुळे आग लागली असल्यास सर्व वाईरिंग, बटन जळुन खाक झाले असते. फॅनचे वरचे मुंडके पडलेले आहे. आग केव्हा लागली याचा नेमकी खुलासा झालेला नाही. सदरील आग शॉर्टसर्कीटमुळे लागलेली नाही. जाणीवपुर्वक जेवढया फाईल जाळायला पाहिजे होत्या तेवढया फाईल जाळण्यात आलेल्या आहेत. अग्निशमन अधिकारी यांचा खुलासा महत्वाचा आहे.

मा.सभापती :प्रशासनाने खुलासा करावा.

मुख्य अग्निशमन अधिकारी :सकाळी अग्निशमन कार्यालयास 8.20 वाजता आग लागल्याचा कॉल आल्यावर 8.39 वाजता आग विझविण्यात आली. विभागातील लाईटचे वायरींग जशीच्या तशी आहे. लाईट चालु अवस्थेत आहे. परंतु खाली जळालेल्या अवस्थेत आहे हे सत्य आहे. दोन्ही बाजुंची तपासणी करावी लागेल.

श्री.रेणुकादास वैद्य :प्रथम दर्शनी काय वाटते.

मुख्य अग्निशमन अधिकारी :प्रथम दर्शनी शॉर्टसर्कीटची शक्यता दिसुन येत नाही. विभागातील सर्व लाईट चालू अवस्थेत आहे.

श्री.समीर राजुरकर :फायरसेफ्टी यंत्रणेबाबत माहिती देण्यात यावी.

मुख्य अग्निशमन अधिकारी :फायर एनओसीबाबत शहर अभियंता यांना एक वर्षापुर्वी पत्र देण्यात आलेले आहे. इस्टीमेट मंजूरीअंती आहे.

श्री.समीर राजुरकर :आस्थापना-2 विभागाबाबत दोन्ही सभागृहात अनेक वेळा विषय चर्चीला गेलेला आहे. अतिशय गंभिर विषय मांडलेला आहे. 1124 संचिका आणि सेवापट जळालेल्या आहेत व बाजुच्या

टेबलवरील संचिका जशाच्या तश्या आहेत. 1124 चा मुद्दा गंभिर स्वरूपाचा असल्याने प्रशासनाने हे सर्व कागदपत्रे व्यवस्थित ठेवण्याची काळजी घेणे गरजेचे होते. स्कॅन करून गोषवारा किती कर्मचाऱ्यांचा ठेवण्यात आलेला आहे. त्याचा बॅकअप आज आहे का? येत्या काही वर्षामध्ये सदरील विषय गंभीर स्वरूपाचा होणार आहे. ज्या विषयाला जी आग लागलेली आहे ती अतिशय गंभिर आहे. याचे दुरगामी परिणाम समोर येणार आहे. बॅकअप नसेल तर जळालेल्या अवस्थेमधील किती संचिका पुर्नजीवीत करता येईल. या विषयाची अतिशय गंभिरतेने त्रयस्थामार्फत चौकशी होणे गरजेचे आहे. टाईमबॉन्ड चौकशी करण्यात यावी. जे दोषी असेल त्यावर गंभिर स्वरूपात कारवाई करण्यात यावी.

श्री.रेणुकादास वैद्य :कुठल्या व किती संचिका जळालेल्या आहेत कुठल्या जळालेल्या नाहीत याबाबतचा अभिप्राय देण्यात यावा. अनुकंपा धर्तीवरील बॉन्डवर झालेल्या नियुक्त्या, वारसा हक्का संदर्भातील संचिका जाळण्यात आलेल्या आहेत. असा अंदाज आहे. सदरील आग कुणी, कशासाठी लावली याबाबतची चौकशी झाली पाहिजे. आग केव्हा लागली आणि कुणी पाहिली याबाबतची माहिती देण्यात यावी.

मुख्य सुरक्षा अधिकारी :सकाळी आठ वाजता सुरक्षा रक्षक श्री. वाघमारे यांनी सुरक्षा अधिकारी यांना फोन करून सांगण्यात आले की, आस्थापना-2 विभागास आग लागलेली आहे. ताबडतोब फायरब्रीगेडला फोन करण्यात आला सकाळी 8.15 वाजता अग्निशमन विभागाची गाडी येवुन आग विझविण्यात आली. रात्रीच्या कर्मचाऱ्यांकडुन सकाळी 6.30 वाजता कर्मचाऱ्यांनी चार्ज घेतला. ओके म्हणुन सांगण्यात आले. मुख्यालयात झाडु मारणाऱ्या महिलेला विभागातुन धुर येतो म्हणुन सकाळी साधारणतः 7.30 वाजता कल्पना दिली. सदरील विभाग अशा पध्दतीने बंद आहे की, बाहेर धुर येण्यासही जागा नाही. आतील चाव्या संबधीत विभागातील कर्मचाऱ्यांकडे असतात.

श्री.गिरजाराम हाळनोर :सदरील खुलासाच संशयास्पद वाटत आहे. सकाळी 7.30 वाजता सफाई करणाऱ्या महिलेच्या ही बाब लक्षात आली आहे. सुरक्षा विभागाने 8 वाजता अग्निशमन विभागास माहिती दिली 8.15 वाजता अग्निशमन विभागाच्या कर्मचाऱ्यांनी आग विझविण्यात आली. 7.30 ते 8.20 या काळात कोपऱ्यात ठेवलेल्याच संचिका कशा जळतात हे संशयास्पद आहे.

उपआयुक्त (म) :सकाळी 8 वाजता विधी सल्लागार श्री.शिरसाठ यांनी मोबाईलद्वारे आस्थापना-2 विभागास आग लागल्याची माहिती मला देण्यात आली. सकाळी 8.45 वाजता कार्यालयात आल्यावर अग्निशमन विभागाने आग आटोक्यात आणली होती. सुरक्षा विभागात चौकशी केली असता. रात्र पाळीत श्री. रमेश गजरा,

श्री. लोखंडे, श्री.सुहास बोर्डे हे सुरक्षारक्षक डयुटीवर होते. सकाळी 7.30 वाजता चार्ज देण्यात आला व डयुटी रजिष्टरवर नोंद करण्यात आली की, श्री.रूपचंद वाघमारे, श्री.बबन जाधव आणि श्री.सुभाष हरणे यांनी लिहुन दिले की, आम्ही सकाळी 6.30 वाजता राऊंड घेतला असता सर्व व्यवस्थित होते. असे लिहुन देण्यात आले. वार्ड अ कार्यालयाचे सॅनिटरी इन्सपेक्टर श्री.कय्युम उपस्थित होते. त्यांनी सांगीतले की, साफसफाई करणाऱ्या महिलेला हे निदर्शनास आले तिने माहिती दिल्यावर सुरक्षा विभागास ही माहिती दिली व त्यानुसार अग्निशमन विभागाने कार्यवाही केली. मा.आयुक्तांना माहिती देण्यात आली त्यांचे सुचनेनुसार पोलिस स्टेशन मध्ये एफआयआर दाखल करण्यात आले. पंचनामा करण्याच्या सूचना देण्यात आल्या. विभागात कोणता कर्मचारी विभागात बसत होता, सर्व विद्युत दिवे, बटन बंद करण्यात आले होते का? या व इतर सर्व बाबींची चौकशी करण्याचे आदेश दिले. प्रथमदर्शनी जे रेकॉर्ड दिसले ते 1124 कर्मचाऱ्यांचे रेकॉर्ड आहे. तसेच कर्मचारी यांचेकडे डयुपलिकेट रेकॉर्ड उपलब्ध असतो त्यानुसार त्यांच्याकडुन ते रेकॉर्ड मागविण्यात येवुन संचिकेंची पुर्नबांधणी होऊ शकते.

श्री.समीर राजुरकर :कर्मचाऱ्यांकडे कागदपत्र उपलब्ध नसतील किंवा दुसरे कागदपत्र दिल्यास त्याचे दुरगामी परिणाम होतील. या प्रकरणाची निवृत्त न्यायाधिशा मार्फत चौकशी करण्यात यावी.

श्रीमती प्राजक्ता राजपुत :त्रयस्थ व्यक्तीमार्फत प्रकरणाची चौकशी करण्यात यावी.

श्री.रेणुकादास वैद्य :स.सदस्यांनी मांडलेल्या मुद्देप्रमाणे निवृत्त न्यायाधिशामार्फत चौकशी करण्यात यावी. एक महिन्याच्या आत चौकशी पुर्ण करून अहवाल स्थायी समितीसमोर ठेवण्यात यावा. जे कुणी दोषी असेल त्यांचेवर कडक कारवाई करण्यात यावी.

मा.सभापती :सभागृहाने तिव्र स्वरूपात आपल्या भावना मांडलेल्या आहेत. सदर प्रकरणात जेष्ठ निवृत्त न्यायाधिशा मार्फत चौकशी करण्यात येवुन एक महिन्याच्या आत स्थायी समितीसमोर अहवाल ठेवण्यात यावा.

श्री.रेणुकादास वैद्य :मंत्रालयात आग लागण्याच्या घटनेचा बोध घेऊन स्थायी समितीने कार्यालयात फायर सेफ्टी यंत्रणा कार्यान्वित करण्याबाबत आदेशित केले होते. प्रशासनाकडुन एक महिन्यात कार्यवाही करणेबाबत सांगण्यात आले होते. परंतु आजपर्यंत कोणतीही कार्यवाही करण्यात आलेली नाही.

मुख्य अग्निशमन अधिकारी :शहर अभियंताकडे संचिका पाठविण्यात आलेली आहे.

मा.सभापती :महानगरपालिका कार्यालयात मा.आयुक्तांच्या विशेष अधिकार वापरून फायरसेफ्टी उपकरणे तात्काळ कार्यान्वित करण्यात यावे.

श्री.समीर राजुरकर :प्रकल्प विभागाने खुलासा करावा की, प्रकल्प विभागाअंतर्गत आयटीआयच्या किती जणांना प्रशिक्षण दिलेले आहे. प्रशिक्षण दिलेल्या नोडल एजन्सीला पेमेंट देण्यात आलेले आहे.

मा.सभापती :खुलासा करण्यात यावा.

श्री.समीर राजुरकर :कागदपत्र उपलब्ध आहे. 903चे आयटीआयचे उदीष्ट होते 434 जणांची ट्रेनिंग झालेली असुन 469 जणांचे पेमेट प्रकल्प विभागाने साडे आठ लाख रूपये अदा केलेले आहे. शासन निर्णयानुसार 60 टक्के रक्कम प्रशिक्षण पुर्ण झाल्यानंतर देण्यात यावे असा आहे व प्रकल्प व्यवस्थित सर्टीफाईड झाल्यावर उरलेले 40 टक्के रक्कम देण्यावी यावी. प्रशिक्षण पुर्ण न झाल्याचे एजन्सीने पत्र देण्यात आलेले आहे. सुवर्ण जयंतीची शनिवार रोजी एक यादी प्रसिध्द झाली. त्यामध्ये नगरसेवकांना चार फॉम देण्यात आले चार फॉमची छाननी करून बँकेमध्ये पाठविण्यात येईल म्हणुन सांगण्यात आले, शनिवार, सोमवारच्या यादीमध्ये स.नगरसेवकांनी दिलेले नांवे आली नाही. 15 टक्के नगरसेवकांनी शिफारस केलेले नांवे यादीमध्ये आलेली आहे. या पलिकडे स.नगरसेवकांनी दिलेले नांवे आलेली नाही. हा या विभागाचा गोरखधंदा चालू आहे.

मा.सभापती :स.नगरसेवकांनी शिफारस केलेले फॉम यादिमध्ये नसतील तर व ते सोडुन दुसरे फॉम असतील तर ताबडतोब थांबविण्यात यावे. स.पदाधिकारी यांनी शिफारस केलेले नांवे ठेवण्यात यावे. इतर फॉमला ताबडतोब स्थगीती देण्यात यावी.

श्री.गिरजाराम हाळनोर:स.नगरसेवकांना चार फॉम देण्यात आले त्यावेळी सांगण्यात आले की, एक्स्ट्रा फॉम देण्यात येणार नाही. जेवढे बजेट आलेले आहे. त्याची विभागणी करुनच फॉम देण्यात आलेले आहे. जर स.नगरसेवकांनी दिलेले नांव यादीमध्ये आले नाही तर सदरील फॉम कुणाला देण्यात आले?

श्री.समिर राजुरकर :सर्व फॉम पात्रतेप्रमाणे वाटायला हवे होते. प्रशासनाने मोठेपणा दाखवुन चार चार फॉम स.नगरसेवकांना देण्यात आले. चार फॉम वार्डात गेले चार पैकी एक नांव पात्रतेअभावी आले नाही हे समजु शकतो परंतु चारही नांवे आले नाही. तसेच स.नगरसेवकांना योग्य माहितीही देण्यात येत नाही.

मा.सभापती :स.नगरसेवकांनी शिफारस केलेले तेवढेच फॉम ठेवण्यात यावे. इतर कुठलेही फॉम ठेवण्यात येवु नये. स.पदाधिकाऱ्यांनी शिफारस केलेले फॉम ठेवण्यात यावे. स.नगरसेवक व पदाधिकाऱ्यांनी सांगितल्याशिवाय फॉमचे वाटप करू नये. वाटप थांबविण्यात यावे.

श्रीमती निलाबाई जगताप:माझ्या वार्डातील नाल्या तसेच वार्डातील साफसफाई होत नाही वारंवार संबधीत अधिकारी यांना विनंती केलेली आहे.

वार्ड अधिकारी-ई :त्यांचे वार्डात 14 मजूर कार्यरत आहेत. साफसफाई करीता वार्डात कंत्राटी मजूर लावण्यात आलेले आहे ते नोव्हेंबर 30 पासून कमी झालेले आहेत. मुदतवाढ मिळणेबाबत शिफारस करण्यात आलेली आहे.

श्री.समिर राजुरकर :स.सदस्या यांचे म्हणण्यानुसार त्यांच्या वार्डात 6 मजूर कार्यरत आहे.

वार्ड अधिकारी-ई :इतर मजूर ट्रकवर लावण्यात आलेले आहे.

श्री.शेख अब्दुल असद :एन-3 एन-4 वार्डासाठी सर्वात जास्त मजूर लावण्यात आलेले आहे.

वार्ड अधिकारी-ई :28 मजूर एन-3 एन-4 साठी लावण्यात आलेले आहे. कंत्राटी मजूरांना मुदतवाढ मिळाल्यास स.सदस्यांचा प्रश्न मिटेल.

मा.सभापती :स.सदस्या श्रीमती निलाताई जगताप यांचे वार्डातील नाल्या सफाई त्वरीत करून साफसफाई करीता वार्डात वाहने व मजूर उपलब्ध करून देण्यात यावे. कंत्राटी मजूरांबाबत प्रशासनाने उचित कार्यवाही करावी.

श्री.रेणुकादास वैद्य :नगररचना विभागाचे ऑडीट बाबत आदेशित केले होते. अहवालाबाबत माहिती देण्यात यावी.

मुख्यलेखापरिक्षक :आठ दिवसांचा अवधी वाढुन देण्यात यावा.

मा.सभापती : अवधी वाढविण्यात येतो लवकरात लवकर अहवाल सादर करण्यात यावा.

श्री.शेख अब्दुल असद :दिल्ली गेट येथील अतिक्रमणबाबत माहिती देण्यात यावी.

उपआयुक्त (सिडको) :सलीम अली सरोवरामध्ये भरती/मुरूम टाकण्याची तक्रार आली होती त्यानुसार नोटीस देण्यात आली. सिडकोची परवानगी असल्याचे सांगण्यात आले. मा.सभापती यांचे सोबत स्थळ पहाणी करण्याचे योजिले होते परंतु काही कारणास्तव स्थळ पहाणी करता आली नाही. मुळ मालक श्रीमती रिझवाना बशीर खान पटेल यांना नोटीस तामील करण्यात आली आहे.

मा.सभापती :उपआयुक्त सिडको यांनी प्रत्यक्ष पहाणी केलेली आहे त्यांना काय आढळुन आले.

श्री.शेख अब्दुल असद :पीआर कार्ड लावुन स्टे आणलेला आहे.

उपआयुक्त (सिडको) :दोन सर्वे क्रमांक आहेत न.भू.क्र.11483 या खुल्या जागेवर नव्यानेच सलीम अली सरोवरात माती भराव टाकुन पत्र्याचे शेड तयार करून अतिक्रमण केले आहे व 11495मध्ये भाडेकरू असल्याचे दाखवून तसे भाडे पावती सादर करून स्थगीती आणलेली आहे.

मा.सभापती :प्लॉटची पुर्ण मार्किंग करून महानगरपालिकेच्या जागेवर केलेले अतिक्रमण काढुन टाकण्यात यावे. सलीम अली सरोवराची बॉऊड्री मोकळी करण्यात यावी.

उपआयुक्त (सिडको) :तात्काळ कारवाई करण्यात येईल.

श्री.रेणुकादास वैद्य :डिपी प्लॅन राबविण्यात येत आहे. नागरीकांनी सर्व गोष्टींना सहकार्य केले आहे. रमानंद कॉलनी 80 फुट रस्ता जात आहे. मोबदला अदा करण्यात आलेले आहे अशी माहिती मिळालेली आहे. रामानंद भागात त्या ठिकाणी अतिक्रमण झालेले आहे. रक्कम अदा केलेली असतांना जागा ताब्यात का घेण्यात येत नाही.

सहा.संचालक न.र. :याबाबतची माहिती घेण्यात येईल.

मा.सभापती :रामानंद कॉलनी, 24 मिटरच्या रस्त्यांचे मार्कींग करून प्रशासकीय अधिकारी यांनी टाऊन प्लॅनिंग विभागाशी समन्वय साधुन योग्य निर्णय घेण्यात यावे.

रस्ता रूंदीकरणामध्ये बाधीत नागरीक आज प्लॉटची मागणी करत आहे. कारण अपार्टमेंट तयार नाही त्यामुळे नागरीकांना महानगरपालिकेवर विश्वास नाही.

**उपअभियंता (स्लम)** :निवीदा प्रक्रीया पुर्ण झालेली आहे.

**श्री.गिरजाराम हाळनोर**:प्रताप नगर ते एकता चौकापर्यंत अतिक्रमण काढण्यात आले होते मार्कींग करण्यात आले होते. त्याठिकाणी कुणालाही मोबदला देण्याची गरज नाही. काही थोडया लोकांना प्लॉट देणार आहे. त्यामुळे तोही रस्ता यामध्ये घेण्यात यावा. रस्ता रूंदीकरणाची मोहीम राबवित असतांना प्रथमतः एक रस्ता पुर्ण करण्यात यावा. ज्या रस्त्यांवर रस्ता रूंदीकरणाची मोहीम राबविण्यात आलेली आहे त्या ठिकाणी नविन रस्ते तयार करण्यासाठी आगामी अर्थसंकल्पामध्ये तरतुद ठेवण्यात यावी.

**मा.सभापती** :फुलेनगर रस्त्याचे इस्टीमेट तयार करण्यात यावे. रस्ता रूंदीकरणाच्या ठिकाणी पुन्हा अतिक्रमण होत आहे ते अतिक्रमण ताबडतोब काढण्यात यावे.

**श्री.गिरजाराम हाळनोर**:एकता चौकापर्यंत रस्ता जातो त्याही लोकांना रमाई आवास योजनेमध्ये घरे/प्लॉट देवु शकतो. पुढे गेल्यानंतर वन विभागाची जागा आहे.

**सहा.संचालक न.र.** :मार्कींग झालेली आहे जे बाधीत होत आहे त्यांना मोबदला देय आहे त्याची कार्यवाही सुरू आहे.

**श्री.गिरजाराम हाळनोर** :शहानुरवाडी येथील बाधीत लोकांना मोबदला दिलेला आहे. माजी महापौर श्री.रशिद मामु यांनाही गारखेडा येथे पर्यायी जागा दिलेली आहे. त्यात कुठलिही अडचण नाही.

**मा.सभापती** :याबाबतीत प्रशासनाने संपुर्ण माहिति घेऊन अतिक्रमण त्वरीत काढण्याची कार्यवाही करावी.

**<u>विषय क्र. 147 :</u>** (विषय क्र. 136 पुढील सभेत ठेवण्याबाबत दि. 28/01/2013 (का.प.क्र.25) रोजीच्या सभेतील निर्णयाप्रमाणे)

दिनांक 21/02/2011 (का.प.क्र.12), 14/03/2011 (का.प.क्र.13), 21/03/2011 (का.प.क्र.14), 22/03/2011 (का.प.क्र.15), 13/04/2011 व 15/04/2011 (दि.13/04/2011 ची तहकुब सभा) (का.प.क्र.16) रोजी संपन्न झालेल्या स्थायी समिती सभांचे इतिवृत्त कायम करणे.

टिप : (इतिवृत्तांताच्या प्रती यापूर्वीच सर्व संबंधीतांना वितरीत करण्यांत आलेल्या आहेत.)

**मा.सभापती** :विषय क्रमांक 147 स्थगीत.

**<u>ठराव :</u>**

प्रस्तुत प्रस्ताव स्थगीत ठेवण्यांत यावा, असे सर्वानुमते ठरले.

**<u>विषय क्र. 148 :</u>** (विषय क्र. 137 पुढील सभेत ठेवण्याबाबत दि. 28/01/2013 (का.प.क्र.25) रोजीच्या सभेतील निर्णयाप्रमाणे)

दिनांक 27/07/2012 (का.प.क्र.7), 03/08/2012 (का.प.क्र.8), 10/08/2012 (का.प.क्र.9), 21/08/2012 (का.प.क्र.10), 28/08/2012 (दि.21/08/2012 ची तहकुब सभा) (का.प.क्र.10), 28/08/2012 (का.प.क्र.11) व 07/09/2012 (का.प.क्र.12) रोजी संपन्न झालेल्या स्थायी समिती सभांचे इतिवृत्त कायम करणे.

टिप : (इतिवृत्तांताच्या प्रती यापूर्वीच सर्व संबंधीतांना वितरीत करण्यांत आलेल्या आहेत.)

**मा.सभापती** :विषय क्रमांक 148 स्थगीत.

**<u>ठराव :</u>**

प्रस्तुत प्रस्ताव स्थगीत ठेवण्यांत यावा, असे सर्वानुमते ठरले.

**विषय क्र. 149 :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, औरंगाबाद शहरातील पाणी टंचाई निवारणार्थ करावयाच्या उपाय योजना अंतर्गत महाराष्ट्र शासनाकडे निधी उपलब्धतेसाठी औरंगाबाद महानगरपालिकेने रूपये 12.53 कोटी रकमेचा प्रस्ताव सादर केला होता. सदरील प्रस्तावात समावेश असलेल्या जायकवाडी उद्‌भव येथील आपत्कालीन पाणी पुरवठा संबंधीच्या विविध प्रकारच्या कामांसाठी रूपये 5.12 कोटी रकमेच्या प्रस्तावास राज्य शासनाने शासन निर्णय क्र. टंचाई 2012/प्र.क्र.422/पापु 14 दि.17/12/2012 अन्वये प्रशासकीय मान्यता दिलेली आहे. यामध्ये 90% रक्कम महाराष्ट्र शासनाकडून निधी मिळणार असून उर्वरीत 10% रक्कम औरंगाबाद महानगरपालिकेस स्वत:च्या सहभागापोटी भरावी लागणार आहे.

राज्य शासनाची प्रशासकीय मान्यता प्राप्त झाल्यानंतर रक्कम रूपये 4,87,19,239/- च्या कामांसाठी राज्यस्तरीय वर्तमानपत्रातुन निविदा प्रसिध्दीस देवुन ई-निविदा मागविण्यात आल्या. एकुण सहा निविदा विक्री झाल्या असुन निविदा स्विकारण्याच्या अंतिम तारखेपर्यंत म्हणजेच दिनांक 15/01/2013 पर्यंत एकुण पाच दर भरलेल्या निविदा प्राप्त झालेल्या आहेत. दिनांक 16/01/2013 रोजी उपस्थित निविदा धारकांसमोर निविदा उघडण्यात आल्या. त्यात निविदेतील अटी व शर्तीनुसार आवश्यक कागदपत्रांची पुर्तता न केल्यामुळे खालील तीन निविदाधारकांच्या वाणिज्य निविदा उघडण्यात आलेल्या नाहीत.

1. एस.एम.सी. इन्फ्रास्ट्रक्चर्स प्रा.लि. ठाणे.
2. पंडित इंजिनिअरींग कंपनी, औरंगाबाद
3. मे.रॉकलाईन कन्स्ट्रक्शन, औरंगाबाद

उर्वरीत दोन निविदाधारकांनी सर्व कागदपत्रांची पुर्तता केलेली असल्यामुळे त्यांच्या वाणिज्य निविदा उघडण्यात आल्या असून निविदेतील दर खालील प्रमाणे प्राप्त झाले आहेत.

1. एम.टी. फड, परभणी : अंदाजपत्रकीय दरापेक्षा 19% जास्त दराने
2. अमित अंजिनिअर्स, औरंगाबाद : अंदाजपत्रकीय दरापेक्षा 25.75% जास्त दराने

प्राप्त निविदांमध्ये तुलनात्मकदृष्ट्या एम.टी. फड यांचे दर सर्वात कमी असून अंदाजपत्रकीय दरापेक्षा 19% जास्त असे आहेत. एम.टी.फड, परभणी यांचे निविदेतील प्राप्त दर हे जास्त वाटत असल्यामुळे दर कमी करण्यासाठी दिनांक 17/01/2012 रोजी वाटाघाटी करण्यात आल्या. परंतु सदरील काम अत्यंत जलदगतीने व कठीण परिस्थितीमध्ये करावे लागणार असल्यामुळे दर कमी करणे शक्य नसल्याचे चर्चेमध्ये सांगितले व त्यांनी तसे लेखी पत्र दिले आहे.

निविदेतील कामे पाणी टंचाई संबंधीची असल्यामुळे अत्यंत जलदगतीने व कालमर्यादेत पुर्ण करणे गरजेचे आहे. दिनांक 04/01/2013 रोजी मा.प्रधान सचिव, लाभक्षेत्र विकास प्राधिकरण यांचे अध्यक्षतेखाली औरंगाबाद येथे झालेल्या बैठकीत पाटबंधारे विभागाने सादर केलेल्या नियोजनानुसार साधारणत: मार्च महिन्याच्या शेवटी जायकवाडी जलाशयातील पाणी पातळी MDDL (455.524 मीटर) च्या खाली जाणार आहे. तसेच दिनांक 31/05/2013 रोजी जलाशयातील पाणी पातळी 454.524 मीटर व दिनांक 31/07/2013 रोजी जलाशयातील पाणी पातळी 453.240 मीटर किंवा त्यापेक्षा खाली जाण्याची शक्यता आहे. दिनांक 04/01/2013 रोजीच्या बैठकीतील चर्चेनुसार व त्यानंतर गोदावरी मराठवाडा पाटबंधारे विकास महामंडळाचे अधिक्षक अभियंता व लाभक्षेत्र विकास प्राधिकरणाचे अधिक्षक अभियंता यांचेसोबत झालेल्या स्थळ पाहणीनुसार व त्यानंतर झालेल्या बैठकीमध्ये केलेल्या

नियोजनानुसार जायकवाडी जलाशयातील डाव्या कालव्यात मोठ्या ड्रेजींग मशिनद्वारे काम करण्यास जास्तीचा खर्च लागणार आहे.

मार्च महिन्यापासून महानगरपालिकेस आपत्कालीन योजनेतून पाणी उपसा करावा लागणार आहे. सदर पाणी टंचाईची कामे मार्च 2013 पुर्वी पुर्ण करण्याबाबत शासनाने निर्देश दिले आहेत. त्यामुळे जास्तीची मशिनरी व यंत्रणेचा वापर करून सदर कामे पुर्ण करणे आवश्यक आहे. मा.आयुक्त महोदय यांनी सदरील कामाची निविदा अंदाजपत्रकीय दरापेक्षा 19% जास्त दराप्रमाणे मान्यतेसाठी शिफारस केली आहे.

तरी सदरील कामासाठी एम.टी.फड यांची अंदाजपत्रकीय दरापेक्षा 19% जास्त दराची निविदा स्विकारणे बाबतचा प्रस्ताव विचारार्थ तथा मान्यतेस्तव सादर.

संवाद :

मा.सभापती : विषय क्रमांक 149.

श्री.समीर राजुरकर :विषय क्रमांक 149 बाबत खुलासा करण्यात यावा.

कार्यकारी अभियंता(पा.पू):पाटबंधारे विभागाने सादर केलेल्या नियोजनानुसार साधारणत: मार्च महिन्याच्या शेवटी जायकवाडी जलाशयातील पाणी पातळी MDDL(455.524 मीटर)च्या खाली जाणार आहे तसेच जलाशयातील पाणी पातळी 453.240 मीटर किंवा त्यापेक्षा खाली जाण्याची शक्यता आहे. त्यामुळे पाणी येणे बंद होऊ शकते. त्यामुळे जायकवाडी जलाशयातील डाव्या कालव्यात मोठया ड्रेजींग मशिनद्वारे काम करण्यास जास्तीचा खर्च लागणार आहे. मार्च महिन्यापासून महानगरपालिकेस आपत्कालीन योजनेतून पाणी उपसा करावा लागणार आहे सदरचे पाणी ऑगष्टपर्यंत पुरणार आहे. अप्रोच चॅनल तयार करावे लागणार आहे. कॅबिनेटमध्ये तत्वत: मान्यता मिळालेली आहे.

मा.सभापती :विषय मंजूर.

ठराव :

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, औरंगाबाद शहरातील पाणी टंचाई निवारणार्थ करावयाच्या उपाय योजनेसाठी व मार्च महिन्यापासून आपत्कालीन योजनेतून पाणी उपसा करणेसाठी जायकवाडी उद्‌भव येथील आपत्कालीन पाणी पुरवठा संबंधीच्या विविध प्रकारच्या कामांसाठीच्या प्रस्तावास राज्य शासनाने मान्यता दिल्यानुसार सदर कामासाठी प्राप्त झालेल्या निविदांपैकी तुलनात्मकदृष्ट्या कमी दराचे निविदाधारकाशी दराबाबत झालेल्या वाटाघाटीअंती दर कमी करणे शक्य नसल्याचे संबंधीताने सांगितल्याने व त्यांनी तसे लेखी पत्र दिल्याने निविदाधारक एम.टी. फड, परभणी यांचेकडून सदरील काम अंदाजपत्रकीय दरापेक्षा 19% जास्त दराने करून घेण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

विषय क्र. 150 :

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, मोहल्ला औरंगपुरा येथील महानगरपालिकेच्या मालकीचे व ताब्यातील औरंगपुरा पिया मार्केट व्यापारी संकुलातील दुकान गाळा क्र. (4) संबंधाने जाहिर निविदा जा.क्र.मनपा/मामअ/853/2011, दि.10/05/2011 अन्वये पिया मार्केट येथील रिक्त असलेल्या दोन दुकानांसाठी निविदा मागविण्यात आले होते. त्यानुसार पिया मार्केट दुकान क्र. (4) (खुल्या वर्गासाठी) मे.चेतन इंटरप्राईजेस भिमनगर, भावसिंगपुरा, प्रो.विलास शंकर त्रिभुवन यांची एकच निविदा प्राप्त झाली. तपशिल खालीलप्रमाणे :

| अ.क्र. | निविदाधारकाचे नांव | अपेषित रक्कम | प्राप्त | शेरा. |
|---|---|---|---|---|

| | | प्रतिमाह | रक्कम | |
|---|---|---|---|---|
| 01. | चेतन इंटरप्राईजेस प्रो.विलास शंकर त्रिभुवन | रू.720/- | रू.820/- | |

**अपेक्षित भाडे दरापेक्षा प्राप्त निविदा दर जास्त आहे. त्यानुसार महानगरपालिकेच्या अटी शर्तीस अधिन राहुन सदर दुकान भाडे तत्वावर देण्याचा प्रस्ताव मान्यतेस्तव सादर.**

**मा.सभापती :विषय क्रमांक 150 मंजूर.**

**ठराव :**

**प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, मोहल्ला औरंगपुरा येथील महानगरपालिकेच्या मालकीचे व ताब्यातील औरंगपुरा पिया मार्केट व्यापारी संकुलातील रिक्त असलेले दुकान गाळा क्र. (4) (खुल्या वर्गासाठी) करीता प्राप्त झालेली जास्त दराची मे.चेतन इंटरप्राईजेस भिमनगर, भावसिंगपुरा, प्रो.विलास शंकर त्रिभुवन यांच्या निविदेस मंजुरी देण्यांत येते. तसेच महानगरपालिकेच्या अटी शर्तीस अधिन राहुन सदर दुकान त्यांना र.रू.820/- प्रतिमाहप्रमाणे भाडे तत्वावर देण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.**

**चर्चा :**

**श्री.समीर राजुरकर : मागील स्थायी समितीमध्ये भोलेश्वर मार्केटमधील दुकान/हॉल महिला बचत गटास भाड्याने दिलेले आहे. भाडे जास्त लावलेले आहे. लावण्यात आलेले भाडे कमी करण्यात यावे. भोलेश्वर मार्केटमध्ये मागील बैठकीत ज्यांना दुकान दिलेले आहे. त्यांना 7500/- रूपये भाड्याने देण्यात आलेले आहे.**

**मा.सभापती : मागील सभेच्या प्रस्तावाला मंजूरी देण्यात आलेली आहे. ठरावात दुरूस्ती करण्यांत यावी. रू.7000/- प्रतिमाह भाडे आकारणीची दुरूस्ती करण्यांत यावी.**

**ऐनवेळचे विषय**

**विषय क्र. 151 :**

शहर अभियंता, महानगरपालिका औरंगाबाद यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, महानगरपालिकेत सद्यस्थितीत वाहनचालकांची खुप कमतरता आहे. महानगरपालिकेची सद्यस्थितीत एकूण कार्यरत वाहने व वाहन चालविणारे एकुण कर्मचारी (नियमित वाहनचालक, दैनिक वेतन वा. चा., वाहन चालविणारे कायमस्वरूपी वर्ग-4 कर्मचारी, कंत्राटी वाहनचालक) यांचा गोषवारा खालीलप्रमाणे आहे.

- महानगरपालिकेची एकुण वाहने : 223
- लिलावासाठी बंद वाहने वजा : 023
  (लिलावासाठीच्या एकुण 39 वाहनांपैकी काही वाहने तातडीची गरज म्हणुन चालु आहेत)
- अग्निशमन विभागाची वाहने वजा : 014
- ट्रॉलीज (वॉटर ट्रॉली/टॉयलेट ट्रॉली) वजा : 005

-----------------

एकुण : 181

-----------------

वरीलप्रमाणे 181 वाहने चालविण्याकरीता आवश्यक वाहनचालक खालीलप्रमाणे आहेत.

- 181 वाहनांकरीता आवश्यक वाहनचालक : 181
- टँकर रिलीव्हर वाहनचालक : 002
- एकुण 4 जेसीबी दोन पाळीत काम करण्यासाठी आवश्यक वाहनचालक : 004
- वाहनचालक 10 टक्के राखीव : 018

--------------------------

एकुण प्रत्यक्ष आवश्यक वाहनचालक : 199

--------------------------

वाहने चालविण्यासाठी सध्या कार्यरत कायमस्वरूपी वाहनचालक/दैनिक वेतन वाहनचालक/परवानाधारक वर्ग-4 कर्मचारी, (कायमस्वरूपी)/ कंत्राटी वाहनचालक इ. बाबत माहिती खालीलप्रमाणे आहे.

1) कायमस्वरूपी वाहनचालक : 81
2) दैनिक वेतन वाहनचालक : 19
3) परवानाधारक वर्ग-4 कर्मचारी : 30
   (अॅटोटिप्पर चालविण्यासाठी वार्ड कार्यालयातुन आलेल्या सहा मजुर सहीत)
4) कंत्राटी वाहनचालक : 61

---------------

उपलब्ध वाहनचालक (वरीलप्रमाणे सर्व मिळुन) एकुण : 191

- निलंबीत व गैरहजर (सतत) वाहनचालक वजा : 02

---------------

प्रत्यक्ष कार्यरत वाहनचालक एकुण : 189

वरीलप्रमाणे महानगरपालिकेच्या 81 कायमस्वरूपी वाहनचालकांपैकी 4 वाहनचालक सेवानिवृत्त झाले आहेत. सध्या एकुण 61 कंत्राटी वाहनचालक घेण्यासाठी प्रस्तावित करण्यात आले आहे. तथापी आवश्यकतेनुसार कंत्राटी वाहनचालकांची संख्या कमी किंवा जास्त होवु शकते.

सद्यस्थितीत सहा महिने कालावधीसाठी एकुण 61 कंत्राटी वाहनचालक घेण्यासाठी अंदाजपत्रकीय रक्कम रू.34,73,340/- खर्च येतो. कंत्राटी वाहनचालक घेण्यासाठी रू.34,73,340/- रकमेचा प्रस्ताव मा.स्थायी समिती समोर ठेवणेसाठी मा.आयुक्त महोदय यांनी शिफारस केली आहे.

तरी एकुण 61 कंत्राटी वाहनचालक सहा महिन्यासाठी घेणे व त्यासाठी येणाऱ्या अंदाजे रू.34,73,340/- रकमेचा प्रस्ताव विचारार्थ तथा मान्यतेस्तव सादर.

संवाद :

श्री.समीर राजुरकर :विषय क्रमांक 151 बाबत माहिती देण्यात यावी.

मा.सभापती :खुलासा करण्यात यावा.

उपअभियंता (यांत्रिकी) :महापालिकेत सद्यस्थितीत वाहनचालकांची कमतरता आहे. एकुण 181 वाहनचालक कार्यरत आहे. 81 कायमस्वरूपी वाहनचालक आहेत त्यापैकी 04 वाहनचालक सेवानिवृत्त झालेले आहेत. दैनिक वेतन वाहनचालकांची संख्या 19 असुन वर्ग चार कर्मचाऱ्यांमधुन ज्यांच्याकडे वाहन चालविण्याचा परवाना आहेत त्यांच्याकडुन काम करून घेण्यात येत आहे. सहा महिन्यामध्ये नविन वाहने खरेदी केलेली आहेत. ते वाहन चालविण्यासाठी वाहनचालकांची आवश्यकता आहे म्हणुन कंत्राटी कर्मचारी घेतलेले आहेत. निवीदा काढण्यासाठी 28 फेब्रुवारी पर्यंत मुदत घेतलेली आहे. पुढील सहा महिन्यासाठी वाहनचालकांची आवश्यकता आहे. वाहने 181 आहेत व उपलब्ध वाहनचालक एकुण 191 आहेत.

श्री.समीर राजुरकर :दोन वाहनचालक किती दिवसांपासून गैरहजर आहेत?

उपअभियंता (यांत्रिकी) :मागील सहा महिन्यांपासून गैरहजर आहेत.

श्री.समीर राजुरकर :गैरहजर वाहनचालकांवर कारवाई करण्यात यावी. तसेच जास्तीचे वाहनचालक कशासाठी हवे?

उपअभियंता (यांत्रिकी) :नैसर्गिकरित्या 10 टक्के वाहनचालक जास्तीचे पाहिजे.

श्री.समीर राजुरकर :सर्व वाहनचालक कोणत्या गाडयांवर व कुठे काम करतात याबाबतची माहिती सर्व स.सदस्यांना देण्याबाबत आदेशित करण्यात यावे.

मा.सभापती :माहिती देण्यात यावी.

उपअभियंता (यांत्रिकी) :दोन वाहनचालक गैरहजर असल्याबाबत आस्थापना विभागास कळविण्यात आलेले आहे. त्यापैकी एका वाहनचालकास निलंबित करण्यात आलेले आहे.

मा.सभापती :प्रशासनाने सहा महिन्याची मुदतवाढी देण्याबाबत कळविले आहे. सहा महिन्याऐवजी तीन महिन्याची मुदत देण्यात यावी. गरज वाटल्यास पुन्हा तीन महिण्याची मुदतवाढ देण्यात येईल.

श्री.रेणुकादास वैद्य :मुदत तीन महिन्यांची देण्यात यावी.

श्री.समीर राजुरकर :एका वाहनचालकास किती पगार देण्यात येतो.

उपअभियंता (यांत्रिकी) :365 रूपये प्रतिदिवस प्रमाणे अदा करण्यात येतो.

मा.सभापती :सहा महिन्याची मान्यता देण्यात येते. वाहनचालक यांना प्रथमतः तीन महिन्यांचे आदेश देण्यात यावे. निवीदा काढल्यानंतर प्रशासनास आवश्यकता वाटल्यास याच धर्तीवर सभागृहातर्फे मुदतवाढ देण्यात येईल.

ठराव :

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, महानगरपालिकेत सद्यस्थितीत वाहनचालकांची कमतरता असल्यामुळे, सहा महिने कालावधीसाठी एकुण 61 कंत्राटी वाहनचालक घेण्यासाठी तयार करण्यांत आलेल्या र.रू.34,73,340/- च्या अंदाजपत्रकास मंजुरी देण्यांत येते. तसेच सभागृहात झालेल्या चर्चेनुसार 61 कंत्राटी वाहनचालकांना सहा महिन्यासाठी घेण्यास मान्यता देण्यांत येते. तथापी

वाहनचालक यांना प्रथमतः तीन महिन्यांचे आदेश देण्यांत यावे. व निविदा काढल्यानंतर प्रशासनास आवश्यकता वाटल्यास याच धर्तीवर सभागृहातर्फे मुदतवाढ देण्यांत येईल. यासह सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते.वैधानिक कार्यवाही व्हावी.

विषय क्र. 152 :

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, शहराच्या ज्या भागात जलवाहीनीद्वारे पाणी पुरवठा करण्यात येत नाही किंवा जलवाहीनीद्वारे पुरेसा पाणी पुरवठा होत नाही अशा भागात टँकरद्वारे पाणी पुरवठा करण्यात येतो. वार्ड अ व ड करीता करीता कोटला पाण्याची टाकी, वार्ड ब व क करीता सिडको एन-5 व वार्ड इ व फ करीता गिरीजा देवी सहकारी सोसायटी पंपगृह येथुन संबंधीत उपअभियंता (पाणी पुरवठा) यांच्या नियंत्रणाखाली टँकरद्वारे आवश्यकतेनुसार पाणी पुरवठा करण्यात येतो. यासाठी महानगरपालिकेचे 10,000 लि. क्षमतेचे सात व 5,000 लि. क्षमतेचे चार असे एकुण अकरा टँकर कार्यरत आहेत.

वर्ष 2012 च्या पावसाळ्यात सरासरी पेक्षा खुपच कमी पाऊस झालेला आहे. परिणामी जमिनीतील पाण्याची पातळी दिवसेंदिवस कमी होत असल्यामुळे काही भागातील बोअरवेलचे पाणी कमी होत आहे. त्यामुळे अशा भागातील नागरीकांची पाण्याच्या टँकरसाठी मोठ्या प्रमाणात मागणी होत आहे. नागरीकांच्या मागणीप्रमाणे टँकरद्वारे पाणी पुरवठा करण्यासाठी महानगरपालिकेचे टँकर कमी पडत असल्यामुळे सध्या भाडेतत्वावरील एकुण 38 वॉटर टँकर कार्यरत ओत. महानगरपालिकेचे 11 आणि भाडेतत्वावर लावलेले 38 असे एकुण 49 पाण्याच्या टँकरच्या दरारोज सर्वसाधारणपणे 325 ते 350 खेपा होत असून सुमारे 2.25 द.ल.लि. पाणी नागरीकांना वितरीत करण्यात येते.

मा.सर्वसाधारण सभा ठराव क्र.865 दिनांक 18/10/2012 नुसार एक दिवसाआड 200 लि. क्षमतेचा एक ड्रम पाणी वितरीत करण्यासाठी प्रति वर्ष 2000/- रूपये शुल्क आकारण्यात येत असून सन 2011-12 या वर्षात सदरील शुल्कापोटी एकुण रक्कम रूपये 70,49,783/- उत्पन्न मिळाले आहे. नवीन दरानुसार सन 2012-13 या आर्थिक वर्षात रक्कम रूपये 1.00 कोटी उत्पन्न मिळेल अशी अपेक्षा आहे. तसेच सदर टँकरद्वारे पाणी पुरवठा करणे कामी सन 2011-12 या आर्थिक वर्षात एकुण रक्कम रू.1,57,90,523/- इतका खर्च झालेला आहे.

समांतर पाणी पुरवठा योजने अंतर्गत शहरातील नागरीकांना टँकरद्वारे पाणी पुरवठा करण्याचे नियोजन औरंगाबाद सिटी वॉटर युटीलिटी कंपनीकडे हस्तांतरीत होणार आहे. औरंगाबाद पाणी पुरवठा योजना सर्वसाधारणपणे एक ते दिड महिन्यात औरंगाबाद सिटी वॉटर युटिलिटी कंपनीकडे हस्तांतरीत होईल असे गृहीत धरून एकुण 38 वॉटर टँकर भाडेतत्वावर लावण्यासाठी सध्याच्या मंजूर दराप्रमाणे एकुण र.रू.45,63,000/- चे अंदाजपत्रक बनविण्यात आले आहे. सदरील कामासाठी मा.आयुक्त महोदय यांनी मान्यता देऊन स्थायी समितीपुढे प्रस्ताव ठेवणेसाठी शिफारस केलेली आहे.

करीता टँकरद्वारे शहरातील नागरीकांना पाणी पुरवठा करण्यासाठी भाडे तत्वावरील 38 पाण्याच्या टँकर करीता र.रू.45,63,000/- च्या रकमेचा प्रस्ताव मा.स्थायी समिती सभेसमोर विचारार्थ तथा मंजुरीस्तव सादर.

मा.सभापती : विषय क्र.152 मंजूर.

ठराव :

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, शहराच्या ज्या भागात जलवाहीनीद्वारे पाणी पुरवठा करण्यात येत नाही किंवा जलवाहीनीद्वारे पुरेसा पाणी पुरवठा होत नाही अशा भागात टँकरद्वारे शहरातील नागरीकांना पाणी पुरवठा करण्यासाठी भाडे तत्वावरील 38 पाण्याच्या टँकर करीता लावण्यासाठी सध्याच्या मंजूर दराप्रमाणे तयार करण्यांत आलेल्या र.रू.45,63,000/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

विषय क्र. 153 :

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, सन २०१३-२०१४ या वित्तीय वर्षात औरंगाबाद महानगरपालिका क्षेत्रातील मालमत्ता करांचे दर व मर्यादा मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ९९ अन्वये फेब्रुवारी महिन्याच्या २० तारखेला निश्चित करणे आवश्यक आहे.

सन २०१३-२०१४ मध्ये कर आकारणी करणेसाठी पूर्वीप्रमाणेच खालील निवासी, निवासेत्तर, व्यावसायीक व औद्योगीक असे चार गट करण्यात आलेले आहे. ते पुढील प्रमाणे,

०१. **निवासी** :- राहते घर, माहिती तंत्रज्ञान वापरासाठी असलेल्या इमारती. (महाराष्ट्र शासनाचे औद्योगीक धोरण परिपत्रक क्र.शासन निर्णय आयटीपी-०३/सीआर-३९११/आयएनडी-७, दिनांक १२-७-२००३ अन्वये माहिती व माहिती तंत्रज्ञान यासाठी मिळकतींचा वापर असल्यास त्यांच्या करात सवलत देणेसाठी डायरेक्टर ऑफ इंडस्ट्रीज, महाराष्ट्र शासन यांचे नोंदणीकृत प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे.) धर्मादाय संस्था, स्वंयसेवी संस्था, सेवाभावी संस्था.

०२. **निवासेत्तर** :- वकीलाचे कार्यालये, कर सल्लागारांचे खाजगी कार्यालये, सर्व शाळा, सर्व महाविद्यालय तसेच सर्व शैक्षणिक संस्था व शैक्षणिक संस्थेशी संलग्न असलेली वस्तीगृहे, स्वतंत्र वस्तीगृहे.

०३. **व्यावसायीक** :- **०१.** पेट्रोलपंप व त्यास संलग्न असलेली खुली जागा, व्यावसायीक दराने खुल्या जागेचे दर वेगळे आकारले जाईल. हॉटेल्स, लॉन्स (लग्न, समारंभासाठी वापरात येणारे लॉन्स) व्यावसायीक वापरासाठी मोकळया जागा, मॉल्स, सर्व प्रकारची दुकाने, **डॉक्टरांचे क्लिनीक,** खाजगी हॉस्पीटल्स्, कमर्शीयल पेड पार्कीगसाठी व्यावसायीक दराने कर आकारण्यात येईल. तसेच ज्या इमारती व्यावसायीक वापरासाठी भाड्याने दिल्या असतील अशा इमारतीनां सुध्दा व्यावसायीक दराने कर आकारणी करण्यात येईल. **धार्मिक स्थळाच्या जागेवर जर व्यावसायीक वापर होत असेल तर त्यास व्यावसायीक दराने कर आकारणी करण्यात येईल.**

०४. **मोबाईल टॉवर्स** :- टॉवरसाठी भाडयाने घेतलेल्या इमारतीतील जागेचे प्रती माह भाडे नुसार किंवा भाडेपट्टा करारनामानुसार यापैकी जे जास्तीचे असेल त्याप्रमाणे कर आकारण्यात येईल. तसेच बी.एस.एन.एल. व इतर दूर संचार कंपनीचे स्वतःच्या जागेत मोबाईल टॉवर असल्यास अशा मोबाईल टॉवरला ऊंची व तळाचे क्षेत्रफळानुसार ठरविलेल्या दरानुसार कर आकारणी करण्यात येईल.

०५. **औद्योगीक** :- एम.आय.डी.सी., औद्योगीक क्षेत्र इत्यादी.

वरील संज्ञेत मोडत असलेल्या मालमत्तेस सामान्य कराचा दर खालील प्रमाणे राहील.

०६ **सामान्य करा बाबतचा तक्ता** :-

| सामान्य कराचा प्रकार वापराप्रमाणे | सध्याचे सामान्य कराचे दर | प्रस्तावित सामान्य कराचे दर |
|---|---|---|
| १. निवासी (उपरोक्त 'अ' प्रमाणे) | ३०% | ३०% |
| २. निवासेत्तर (उपरोक्त 'ब' प्रमाणे) | ३७.५% | ३७.५% |
| ३. व्यावसायीक (उपरोक्त 'क' प्रमाणे) | ४५% | ४५% |
| ४. औद्योगीक (उपरोक्त 'ड' प्रमाणे) | ३६% | ३६% |

०७. **नामांतर शुल्क** :-

७.१ खरेदी विक्री आधारे किंवा इतर कोणत्याही मार्गाने हस्तांतरण केलेल्या दस्त / कागदपत्र आधारे नामांतर शुल्क कर योग्य मुल्यावर खालील प्रमाणे आकारण्यात येतील.

| निवासी व व्यावसायीक | नामांतर शुल्क |
|---|---|

| कर योग्य मुल्य | निवासी | व्यावसायीक |
|---|---|---|
| रू. ०१ ते १०,०००/- | रू.१०००/- | रू.२०००/- |
| रू. १०,००१/- ते ५०,०००/- | रू.३०००/- | रू.६०००/- |
| रू. ५०,००१/- ते पुढे | रू.६०००/- | रू.१२,०००/- |
| औद्योगिक वसाहतीतील मिळकती | वरील प्रमाणे | रू.५०,०००/- |

०८. **विलंब शुल्क** :-

औरंगाबाद महानगरपालिकेच्या कार्यक्षेत्रातील थकीत मालमत्ता कराची वसूली प्रभावीपणे होण्यासाठी व महानगरपालिकेची वसूलीत वाढ व्हावी म्हणुन थकीत मालमत्ता करावर विलंब शुल्क १० टक्के आकारण्यात येईल.

८.१ शासन निर्णय क्र.एम.यु.बी./एम.यु.पी.-२००९/१७९/प्र.क्र.४०/०९/नवि-१९, दि.५-२-२००९ अन्वये अवैध बांधकाम किंवा पूनर बांधकामास तथा इमारतीवर बसविण्या योग्य असलेल्या मालमत्ता कराच्या दुप्पट इतकी शास्ती ते बांधकाम जो पर्यंत अवैध म्हणून राहील तो पर्यंत वसूल करण्यात येईल.

०९. **विशेष सवलती** :-

९.१ पाच वर्षाचा आगाऊ (ॲडव्हान्स) मालमत्ता कर भरणाऱ्यास वार्षीक कराच्या सामान्य करात एक वर्षाची सूट देण्यात येईल.

९.२ तीन वर्षाचा आगाऊ (ॲडव्हान्स) मालमत्ता कर भरणाऱ्या एक वर्षातील वार्षीक कराच्या सामान्य करात ५०% सूट देण्यात येईल.

९.३ जे मालमत्ताधारक आपल्या मिळकतीत सोलर सिस्टीम लावतील त्यांना सामान्य करात चालु वर्षात ५% सुट देण्यात येईल.

९.४ जे मालमत्ताधारक चालु वर्षाच्या खालील महिन्यात मालमत्ता कर भरणा करतील त्यांना सन २०१३-२०१४ करीता सामान्य करात पुढील प्रमाणे सूट देय राहील.

| | |
|---|---|
| एप्रिल | १०% |
| मे | ८% |
| जुन | ६% |
| जुलै | ४% |

ऑगस्ट ते मार्च सूट अनुज्ञेय होणार नाही व थकबाकीवर सूट देय राहणार नाही.

९.५. माजी सैनिकांना व स्वातंत्र्य सैनिकांना मागील वर्षाप्रमाणेच सन २०१३-२०१४ या आर्थिक वर्षात देखील निवासी वापर करीत असलेल्या केवळ एक मिळकतीस सामान्य करात १००% सूट दिली जाईल. सदरील सूट ही स्वतः किंवा त्यांचे पत्नी हयात असे पर्यंत लागु राहील.

९.६ जे मालमत्ताधारक आपल्या मालमत्तेस रेन हार्वेस्टींग सिस्टीम (Rain Harvesting System) लागु करतील, अशा मालमत्ताधारकास सामान्य करात ५% सवलत देय होईल.

१०. **कर आकारणी प्रणाली** :-

औरंगाबाद शहराचे वेगवेगळे भाग पाडुन त्याभागातील मिळकतीच्या / जागेचा मुल्यानुसार त्यांचे वाजवी भाडे आकारणी करण्यासाठी विचारात घेण्यात येते. अशा प्रकारचे भाग पाडुन

मुल्यांकन हे महाराष्ट्र शासनाकडील औरंगाबाद शहराचे नोंदणी महानिरीक्षक, मुंद्राक शुल्क यांनी आकारणीसाठी तयार केलेले सिध्द शिघ्र गणका मधील निवासी जागांच्या किमंती विचारात घेवुन औरंगाबाद शहराचे खालील प्रमाणे भाग करणे योग्य होईल. यामुळे औरंगाबाद शहरातील वेगवेगळया भागातील मूल्य (जागेचे) वेगवेगळे मिळवुन त्यानुसार मिळकतीचा स्तर (वर्गीकरण) होवुन त्यानुसार मालमत्ता कर आकारणीसाठी दर आकारणे योग्य राहील.

१०.१ सन २०१० चे महाराष्ट्र शासनाकडील सिध्द शिघ्र गणक (Ready Recknor) आधारे दिनांक १- ४-२०१० पासून औरंगाबाद महानगरपालिका हद्यीतील सर्व मिळकतीसाठी चार विभाग हे मा.सर्वसाधारण सभेचा ठराव क्र.९८५ दि.२०-२-२०१० नुसार पूर्वी प्रमाणेच करण्यात आलेले आहेत.

त्यानुसार खालील भागासाठी शिघ्र शिध्द गणकातील दिलेल्या दरानुसार अ, ब, क, व ड असे चार भाग होतात. खालील कोणत्या भागात कोणती मिळकत येते, हे तपासता येईल. तसेच दरवर्षी दर बदलले तरी कर आकारणीसाठी हे विभाग पुढील चार वर्षासाठी असेच ठेवण्यात येतील.

| अ. क्र. | विभाग | सन २०१० च्या विभागानुसार मिळकतीचा प्रचलीत दर /चौ.मी. | सन २०१० च्या विभागानुसार प्रस्तावित मिळकतीचा दर /चौ.मी. |
|---|---|---|---|
| १ | अ | रू.१४,०००/- पेक्षा जास्त असलेल्या सर्व मिळकती | रू.१४,०००/- पेक्षा जास्त असलेल्या सर्व मिळकती |
| २ | ब | रू.११,००० ते रू.१३,९९९/- | रू.११,००० ते रू.१३,९९९/- |
| ३ | क | रू.९,००० ते रू.१०,९९९/- | रू.९,००० ते रू.१०,९९९/- |
| ४ | ड | रू.७००० ते ८,९९९/- आणि (यापेक्षा कमी किंमतीस असलेल्या सर्व मिळकती) | रू.७००० ते ८,९९९/- आणि (यापेक्षा कमी किंमतीस असलेल्या सर्व मिळकती) |

वरील प्रस्तावित दर हे महाराष्ट्र शासनाकडील औरंगाबाद शहराचे नोंदणी महानिरीक्षक, मुंद्राक शुल्क यांनी आकारणीसाठी तयार केलेले सिध्द शिघ्र गणकामधील घेण्यात आलेले आहे.

सिध्द शिघ्र गणक सन २०१२ व १३ नुसार शहरातील पाच विभागांच्या दरांचा तुलनात्मक तक्ता तयार केला असता त्यामध्ये सरासरी २६.६७ टक्के वाढ होत असल्याचे निदर्शनास आले.

त्यामुळे कर आकारणीचे दर हे चार वर्षांनी एकदम न वाढविता दरवर्षी टप्प्याटप्प्याने वाढविले तर मिळकतधारकांवर एकदम बोजा पडणार नाही. त्यामुळे प्रस्तावित कर आकारणीच्या दरात २० टक्के वाढ करण्यात आलेली आहे.

**११. सन २०१२-२०१३ या आर्थिक वर्षामध्ये कर योग्य मुल्य निश्चित करणेकरीता खालील प्रमाणे वर्गीकरणानुसार व सिध्द शिघ्र गणकानुसार प्रती माह प्रती चौ.मी. प्रचलीत दर आकारण्यात येत आहे. :-**

**११.१ निवासी वापर असलेल्या इमारतीच्या बांधकामास प्रती माह प्रती चौ.मी. प्रचलीत दर :-**

| अ.क्र. | प्रकार | अ | ब | क | ड |
|---|---|---|---|---|---|
| १ | आर.सी.सी.छत | रू.११/- | रू.१०/- | रू.९/- | रू.८/- |
| २ | गोल पटाव लाकडी छत | रू.१०/- | रू.९/- | रू.८/- | रू.६/- |
| ३ | लोखंडीपत्रे (सिमेंटपत्रे) मंग्लोर टाईल्स | रू.९/- | रू.८/- | रू.७/- | रू.५/- |
| ४ | सिमेंटचे पत्रे किंवा (बांबुचे तट्टर) | रू.८/- | रू.३/- | रू.२/- | रू.१/- |

**११.२ सन २०१३-१४ या आर्थिक वर्षासाठी निवासी वापर असलेल्या इमारतीच्या बांधकामास प्रती माह प्रती चौ.मी. प्रस्तावित दर खालील प्रमाणे :-**

| अ.क्र. | प्रकार | अ | ब | क | ड |
|---|---|---|---|---|---|

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| १ | आर.सी.सी.छत | रू.१३/- | रू.१२/- | रू.११/- | रू.१०/- |
| २ | गोल पटाव लाकडी छत | रू.१२/- | रू.११/- | रू.१०/- | रू.७/- |
| ३ | लोखंडीपत्रे (सिमेंटपत्रे) मंग्लोर टाईल्स | रू.११/- | रू.१०/- | रू.८/- | रू.६/- |
| ४ | सिमेंटचे पत्रे किंवा (बांबुचे तट्टर) | रू.१०/- | रू.४/- | रू.२/- | रू.१/- |

**११.३ (अ) सन २०१२-१३ या आर्थिक वर्षासाठी निवासेतर वापर असलेल्या इमारतीच्या बांधकामास प्रती माह प्रती चौ.मी. प्रचलीत दर खालील प्रमाणे :-**

| अ.क्र. | प्रकार | अ | ब | क | ड |
|---|---|---|---|---|---|
| १ | आर.सी.सी.छत | रू.२२/- | रू.२०/- | रू.१८/- | रू.१७/- |
| २ | गोल पटाव लाकडी छत | रू.१८/- | रू.१६/- | रू.१४/- | रू.९/- |
| ३ | लोखंडीपत्रे (सिमेंटपत्रे) मंग्लोर टाईल्स | रू.१५/- | रू.१४/- | रू.१२/- | रू.७/- |
| ४ | सिमेंटचे पत्रे किंवा (बांबुचे तट्टर) | रू.१३/- | रू.६/- | रू.३/- | रू.२/- |

**११.४ (अ) सन २०१३-१४ या आर्थिक वर्षासाठी निवासेतर वापर असलेल्या इमारतीच्या बांधकामास प्रती माह प्रती चौ.मी. प्रस्तावित दर खालील प्रमाणे :-**

| अ.क्र. | प्रकार | अ | ब | क | ड |
|---|---|---|---|---|---|
| १ | आर.सी.सी.छत | रू.२६/- | रू.२४/- | रू.२२/- | रू.२०/- |
| २ | गोल पटाव लाकडी छत | रू.२२/- | रू.१९/- | रू.१७/- | रू.११/- |
| ३ | लोखंडीपत्रे (सिमेंटपत्रे) मंग्लोर टाईल्स | रू.१८/- | रू.१७/- | रू.१४/- | रू.८/- |
| ४ | सिमेंटचे पत्रे किंवा (बांबुचे तट्टर) | रू.१६/- | रू.७/- | रू.४/- | रू.२/- |

**११.५ (ब) सन २०१२-१३ या आर्थिक वर्षासाठी अनुदानीत शैक्षणिक संस्था वापर असलेल्या इमारतीच्या बांधकामास प्रती माह प्रती चौ.मी. प्रचलीत दर खालील प्रमाणे :-**

| अ.क्र. | प्रकार | अ | ब | क | ड |
|---|---|---|---|---|---|
| १ | आर.सी.सी.छत | रू.१४/- | रू.१२/- | रू.११/- | रू.१०/- |
| २ | गोल पटाव लाकडी छत | रू.१३/- | रू.११/- | रू.१०/- | रू.९/- |
| ३ | लोखंडीपत्रे (सिमेंटपत्रे) मंग्लोर टाईल्स | रू.१२/- | रू.१०/- | रू.९/- | रू.८/- |
| ४ | सिमेंटचे पत्रे किंवा (बांबुचे तट्टर) | रू.११/- | रू.९/- | रू.८/- | रू.७/- |

**११.६ सन २०१३-१४ या आर्थिक वर्षासाठी अनुदानीत शैक्षणिक संस्था वापर असलेल्या इमारतीच्या बांधकामास प्रती माह प्रती चौ.मी. प्रस्तावित दर खालील प्रमाणे :-**

| अ.क्र. | प्रकार | अ | ब | क | ड |
|---|---|---|---|---|---|
| १ | आर.सी.सी.छत | रू.१७/- | रू.१४/- | रू.१३/- | रू.१२/- |
| २ | गोल पटाव लाकडी छत | रू.१६/- | रू.१३/- | रू.१२/- | रू.११/- |
| ३ | लोखंडीपत्रे (सिमेंटपत्रे) मंग्लोर टाईल्स | रू.१४/- | रू.१२/- | रू.११/- | रू.१०/- |
| ४ | सिमेंटचे पत्रे किंवा (बांबुचे तट्टर) | रू.१३/- | रू.११/- | रू.१०/- | रू.८/- |

**११.७ (क) सन २०१२-१३ या आर्थिक वर्षासाठी कायम विना अनुदानीत शैक्षणिक संस्था वापर असलेल्या इमारतीच्या बांधकामास प्रती माह प्रती चौ.मी. प्रचलीत दर खालील प्रमाणे :-**

| अ.क्र. | प्रकार | अ | ब | क | ड |
|---|---|---|---|---|---|
| १ | आर.सी.सी.छत | रू.१७/- | रू.१५/- | रू.१४/- | रू.१३/- |
| २ | गोल पटाव लाकडी छत | रू.१६/- | रू.१४/- | रू.१३/- | रू.१२/- |
| ३ | लोखंडीपत्रे (सिमेंटपत्रे) मंग्लोर टाईल्स | रू.१५/- | रू.१३/- | रू.१२/- | रू.११/- |
| ४ | सिमेंटचे पत्रे किंवा (बांबुचे तट्टर) | रू.१४/- | रू.१२/- | रू.११/- | रू.१०/- |

**११.८ सन २०१३-१४ या आर्थिक वर्षासाठी कायम विना अनुदानीत शैक्षणिक संस्था वापर असलेल्या इमारतीच्या बांधकामास प्रती माह प्रती चौ.मी. प्रस्तावित दर खालील प्रमाणे :-**

| अ.क्र. | प्रकार | अ | ब | क | ड |
|---|---|---|---|---|---|
| १ | आर.सी.सी.छत | रू.२०/- | रू.१८/- | रू.१७/- | रू.१६/- |
| २ | गोल पटाव लाकडी छत | रू.१९/- | रू.१७/- | रू.१६/- | रू.१४/- |
| ३ | लोखंडीपत्रे (सिमेंटपत्रे) मंग्लोर टाईल्स | रू.१८/- | रू.१६/- | रू.१४/- | रू.१३/- |
| ४ | सिमेंटचे पत्रे किंवा (बांबुचे तट्टर) | रू.१७/- | रू.१४/- | रू.१३/- | रू.१२/- |

**११.९ सन २०१२-१३ या आर्थिक वर्षासाठी व्यावसायीक वापर असलेल्या इमारतीच्या बांधकामास प्रती माह प्रती चौ.मी. साठी प्रचलीत दर खालील प्रमाणे :-**

| अ.क्र. | प्रकार | अ | ब | क | ड |
|---|---|---|---|---|---|
| १ | आर.सी.सी.छत | रू.२८/- | रू.२६/- | रू.२४/- | रू.२२/- |
| २ | गोल पटाव लाकडी छत | रू.२४/- | रू.२२/- | रू.१९/- | रू.१७/- |
| ३ | लोखंडीपत्रे (सिमेंटपत्रे) मंग्लोर टाईल्स | रू.२०/- | रू.१८/- | रू.१६/- | रू.१४/- |
| ४ | सिमेंटचे पत्रे किंवा (बांबुचे तट्टर) | रू.१६/- | रू.१४/- | रू.१२/- | रू.१०/- |

**११.१० सन २०१३-१४ या आर्थिक वर्षासाठी व्यावसायीक वापर असलेल्या इमारतीच्या बांधकामास प्रती माह प्रती चौ.मी. साठी प्रस्तावित दर खालील प्रमाणे :-**

| अ.क्र. | प्रकार | अ | ब | क | ड |
|---|---|---|---|---|---|
| १ | आर.सी.सी.छत | रू.३४/- | रू.३१/- | रू.२९/- | रू.२६/- |
| २ | गोल पटाव लाकडी छत | रू.२९/- | रू.२६/- | रू.२३/- | रू.२०/- |
| ३ | लोखंडीपत्रे (सिमेंटपत्रे) मंग्लोर टाईल्स | रू.२४/- | रू.२२/- | रू.१९/- | रू.१७/- |
| ४ | सिमेंटचे पत्रे किंवा (बांबुचे तट्टर) | रू.१९/- | रू.१७/- | रू.१४/- | रू.१२/- |

**११.११ औद्योगिक क्षेत्रासाठी दर :-**

| अ.क्र. | बांधकामाचा वर्ग | सन २०१२-१३ साठी प्रचलीत दर | सन २०१३-१४ साठी प्रस्तावित दर |
|---|---|---|---|
| | | चौ.मी. | चौ.मी. |
| १ | कारखाना कार्यालय (आर.सी.सी.) | १४.६४ | १८ |
| | पक्के बांधकाम (अे.सी.सी. शिटस्) | १०.३२ | १२ |
| | कारखाना कार्यशाळा (आर.सी.सी.) | ११.६२ | १४ |
| | पक्के बांधकाम (अे.सी.सी. शिटस्) | ९.०४ | ११ |
| २ | **कारखाना परिसरातील कॅन्टीन** | २४.०० | २९ |
| ३ | **गोदाम (आर.सी.सी.)** | ९.६८ | १२ |
| | पक्के बांधकाम (अे.सी.सी.शिटस्) | ९.६८ | १२ |
| | अर्ध पक्के | ५.८२ | ७ |
| | कच्चे आणि विना छताचे | ३.२२ | ४ |
| ४ | **शेड** | २.५८ | ३ |
| ५ | सायकल स्टॅन्ड | ३.८६ | ५ |
| ६ | **मशिनरी प्लॅन्ट (आर.सी.सी.)** | ११.४० | १४ |
| | पक्के बांधकाम (अे.सी.सी.शिटस्) | ८.८२ | ११ |
| | अर्ध पक्के बांधकाम | ७.१० | ९ |
| | कच्चे बांधकाम | ३.१० | ४ |
| ७ | **निवासी क्षेत्र (आर.सी.सी.)** | १६.१४ | १९ |
| | पक्के बांधकाम (अे.सी.सी.शिटस्) | १२.९२ | १५ |
| | अर्धे पक्के बांधकाम | ११.४० | १४ |
| | कच्चे बांधकाम | ६.४४ | ८ |
| ८ | **सहान जागा** | | |
| | कारखाना वापर | १२.०४ | १४ |
| | रिकामे | ९.०३ | ११ |

**११.१२ सन २०१२-१३ या आर्थिक वर्षासाठी मंजूर रेखांकनातील मोकळया खाजगी भूखंडासाठी खुल्या जागेची कर आकारणीसाठी खालील प्रमाणे प्रचलीत दर :-**

| अ.क्र. | मोकळया जागेचा प्रकार | अ | ब | क | ड |
|---|---|---|---|---|---|
| १ | केवळ मोकळया जागा / निवासी पार्कींग बखळ | रू.३.००/- | रू.२.५०/- | रू.२.००/- | रू.२/- |

**११.१३ सन २०१३-१४ या आर्थिक वर्षासाठी मंजूर रेखांकनातील मोकळया खाजगी भूखंडासाठी खुल्या जागेची कर आकारणीसाठी खालील प्रमाणे प्रस्तावित दर :-**

| अ.क्र. | मोकळया जागेचा प्रकार | अ | ब | क | ड |
|---|---|---|---|---|---|
| १ | केवळ मोकळया जागा / निवासी पार्कींग बखळ | रू.४.००/- | रू.३/- | रू.२/- | रू.२/- |

**११.१४ सन २०१२-१३ या आर्थिक वर्षासाठी निवासेतर / व्यावसायीक इमारतीसमोरील असलेल्या मोकळ्या जागेसाठी कर आकारणीसाठी खालील प्रमाणे प्रचलीत दर :-**

| अ.क्र. | मोकळया जागेचा प्रकार | अ | ब | क | ड |
|---|---|---|---|---|---|
| २ | विकसीत केलेले व्यापारी तत्वावर वापरात असलेल्या मोकळया जमीनी बिगर निवासी प्रकार, लॉन्स, पेट्रोल पंप, गार्डन रेस्टॉरन्ट, इत्यादी | रू.१२.५०/- | रू.१०.५०/- | रू.९.००/- | रू.७/- |

**११.१५ सन २०१३-१४ या आर्थिक वर्षासाठी निवासेतर / व्यावसायीक इमारतीसमोरील असलेल्या मोकळ्या जागेसाठी कर आकारणीसाठी खालील प्रमाणे प्रस्तावित दर :-**

| अ.क्र. | मोकळया जागेचा प्रकार | अ | ब | क | ड |
|---|---|---|---|---|---|
| २ | विकसीत केलेले व्यापारी तत्वावर वापरात असलेल्या मोकळया जमीनी बिगर निवासी प्रकार, लॉन्स, पेट्रोल पंप, गार्डन रेस्टॉरन्ट, इत्यादी | रू.१५/- | रू.१३/- | रू.११/- | रू.८/- |

**टिप** :- मोकळ्या जागेची आकारणी करतांना फक्त सामान्य कर आकारण्यात येईल.

**१२. मालमत्ता कर आकारणी करणेसाठी सन २०१२-२०१३ साठी प्रचलीत दर व सन २०१३-१४ चे प्रस्तावित दर पुढील प्रमाणे :-**

| अ.क्र. | कराचे नांव | कर योग्य मुल्य रूपये | सन २०१२-१३ साठी प्रचलीत दर | सन २०१३-१४ साठी प्रस्तावित दर |
|---|---|---|---|---|
| १ | सामान्य कर | १. निवासी वापरासाठी | ३० % | ३० % |
| | | २. निवासेत्तर वापरासाठी | ३७.५% | ३७.५% |
| | | ३. व्यावसायीक वापरासाठी | ४५% | ४५% |
| २ | साफसफाई कर | १. निवासी वापरासाठी | ३ % | ३ % |
| | | २. निवासेत्तर वापरासाठी | १० % | १० % |
| | | ३. व्यावसायीक वापरासाठी | १० % | १० % |
| ३ | वृक्षकर | कोणत्याही कर योग्य मुल्यावर | १ % | १ % |
| ४ | अग्निशमन कर | | १.५ % | १.५ % |
| ५ | मनपा शिक्षण कर | | २ % | २ % |
| ६ | पथकर | | २ % | २ % |
| ७ | जललाभ कर | | १.५ % | १.५ % |
| ८ | जलनि:सारण कर | | १.५ % | १.५ % |
| ९ | सेवरेज कर | १. निवासी वापरासाठी | १० % | १० % |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | | २. निवासेत्तर व व्यावसायीक वापरासाठी | १५ % | १५ % |
| | | ३. औद्योगिक वापरासाठी | ५ % | ५ % |
| | | ४. औद्योगिक वसाहतीतील निवासी वापर | १० % | १० % |
| **एकूण कर** | | निवासी | ५५.५% | ५५.५% |
| | | निवासेतर | ७९% | ७९% |
| | | व्यावसायीक | ८६.५% | ८६.५% |

१३ **शासनाचे कर** :- तसेच राज्य शिक्षण कर, रोजगार हमी कर व मोठया निवासी क्षेत्रावरील कर शासन निर्णयाप्रमाणे व दराप्रमाणे कर योग्य मुल्यावर आकारणे योग्य.

वरील कर आकारणीच्या दर निश्चिती मध्ये सन २०१२-१३ च्या दरात २० टक्के वाढ करण्यात आली असून वाढ करतांना कराच्या दराला त्याच्या जवळच्या रूपयात रूपांतरीत करण्यात आले आहे. मालमत्ता कर वसूल करण्याची टक्केवारी ही सन २०१२-१३ प्रमाणेच सन २०१३-१४ साठी कायम करण्याचे प्रस्तावित करण्यात येते.

करिता, प्रस्ताव मान्यतेस्तव तथा विचारार्थ सादर.

**ठराव :**

**प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, सन 2013-14 या वित्तीय वर्षात औरंगाबाद महानगरपालिका क्षेत्रातील मालमत्ता करांचे दर व मर्यादा मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम 1949 चे कलम 99 अन्वये फेब्रुवारी महिन्याच्या 20 तारखेला निश्चित करणे आवश्यक असल्याने मालमत्ता कर दर निश्चितीचा प्रस्ताव प्रशासनातर्फे सादर करण्यात आलेला आहे. सदर प्रस्तावावर सर्वसाधारण सभेने योग्य तो निर्णय घ्यावा यासाठी प्रशासनाचा प्रस्ताव सर्वसाधारण सभेकडे पाठविण्यात यावा असे सर्वानुमते ठरले. वैधानिक कार्यवाही व्हावी.**

**याचबरोबर मा.सभापती यांनी राष्ट्रगिताने सभा संपन्न झाल्याचे घोषित केले.**

**नगर सचिव,**
**महानगरपालिका औरंगाबाद**